# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

डॉ. संजयकुमार दळवी
एम्.एस्सी., पीएच्.डी.
प्र. कार्यक्रम समन्वयक

कार्यालय क्र. : ०२०-२५६९७३४१
०२०-२५६०११५३
०२०-२५६०११६०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३४१


संदर्भ : रासेयो/२५७/२०१४

दि. १ डिसेंबर २०१४

प्रति
मा.प्राचार्य /कार्यक्रम अधिकारी,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

विषय :— राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत जिल्हास्तरीय/विद्यापीठस्तरीय/राज्यस्तरीय प्रकल्प आयोजनाबाबत.

महोदय,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत ३६० राष्ट्रीय सेवा योजना महाविद्यालयांमध्ये ४६००० स्वयंसेवक व ५८० रासेयो कार्यक्रम अधिकारी यांच्या सहकार्याने राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत विविध उपक्रम राबविले जातात. राष्ट्रीय सेवा योजना महाविद्यालयांमध्ये दरवर्षी पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हयांतील रासेयो एककांतर्गत १/२/५/७ दिवसीय जिल्हास्तरीय/विभागस्तरीय/विद्यापीठस्तरीय/राज्यस्तरीय कार्यशाळा/शिबिरांचे आयोजन करण्यात येते.

त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१४—१५ मध्ये ज्या महाविद्यालयांना राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत वरीलप्रमाणे कार्यशाळा/शिबिरे आयोजित करावयाची आहेत अशा महाविद्यालयांमार्फत **'स्वच्छ व स्वस्थ भारत अभियान'** या मुख्य संकल्पनेवर आधारीत प्रकल्प/कार्यशाळा/शिबिरे राबविण्यात यावीत. **''स्वच्छ व स्वस्थ भारत अभियान'' ही एक निरंतर व शाश्वत प्रक्रिया असून त्यानुसार उपक्रमाचे प्रस्ताव तयार करतांना काळजी घ्यावी. सदर उपक्रमातून विद्यार्थी आणि समाज या घटकांपर्यत स्वच्छ व स्वस्थ भारत ही संकल्पना दृढ व्हावी असा उद्देश्य आहे.** त्यासंदर्भात महाविद्यालयांनी आपले प्रस्ताव **कार्यक्रम पत्रिका व खर्चाचे तपशीलासहीत** रासेयो कार्यालयास दि. १५ डिसेंबर २०१४ पर्यत पाठवावेत ही विनंती.

सदर कार्यशाळेचा खर्च तात्पुरत्या स्वरूपात महाविद्यालयाने करावयाचा असून कार्यशाळेचे संपूर्ण अनुदान केंद्रीय लेखा परिक्षणाच्या वेळी (रु. २००००/— पुढील रकमेकरीता लेखा परिक्षण करून) लेखे (विनीयोग प्रमाणपत्र, खर्चाचे विवरण पत्र, मुळ देयके, विद्यार्थी उपस्थिती पत्र मुळ प्रत) सादर केल्यानंतर अदा करण्यात येईल. तसेच कार्यशाळा आयोजनानंतर दहा दिवसांचे आत सदर कार्यशाळेचा सविस्तर अहवाल व छायाचित्रे (C.D. सहीत) रासेयो कार्यालयास सादर करावे ही विनंती. कळावे,

आपला विश्वासू

1/12/14

प्र. कार्यक्रम समन्वयक,
राष्ट्रीय सेवा योजना